॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ


जा.क्र.कबचौउमवि/७-अ/ २९५० /२०२० दिनांक: २६/१०/२०२०

प्रति,

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक.

२) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव च्या सर्व प्रशाळांचे
मा. संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख

विषय :- उन्हाळी २०२० मधील ऑक्टोबर-२०२० मध्ये घेण्यात येत असलेल्या अंतिम वर्ष/ अंतिम सत्र बॅकलॉगसह MCQ based ऑनलाईन/ऑफलाईन परीक्षेपासून विविध कारणाने वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी देणेबाबत........

संदर्भ :- विद्यापीठाचे परिपत्रक क्र.२०१/२०२०,जा.क्र. कबचौउमवि/७-अ/परीक्षा/२२८३/२०२०, दिनांक १० सप्टेंबर, २०२०.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भांकित परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, कोवीड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रादूर्भावामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून वेळोवेळी जाहीर करण्यात आलेली टाळेबंदीमुळे विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठ प्रशाळा/ विभागातील विद्यार्थ्यांच्या स्थगीत करण्यात आलेल्या पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विविध विषयांच्या अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या बॅकलॉगसह माहे मार्च/ एप्रिल/ मे-२०२० मधील, उन्हाळी-२०२० च्या परीक्षा मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८.०८.२०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार त्याचप्रमाणे मा.कुलपती तथा राज्यपाल यांनी दिलेले निर्देश आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार माहे ऑक्टोबर-२०२० मध्ये दिनांक १२ ऑक्टोबर २०२० पासून ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने आयोजित करण्यात आल्या होत्या.

विद्यापीठाचे संदर्भांकित परिपत्रकातील (ड) ९. वर **"वरील कालावधीमध्ये कोणत्याही कारणास्तव जे विद्यार्थी परीक्षा देऊ शकणार नाहीत, त्यांचेसाठी एक संधी उपलब्ध करुन स्वतंत्र परीक्षेचे आयोजन करण्यात येईल."** असे नमूद करण्यात आलेले आहे.

**त्या अनुषंगाने प्राप्त आदेशान्वये, माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये घेण्यात आलेल्या या परीक्षेस परीक्षा अर्ज सादर करुनही जे विद्यार्थी अपरिहार्य कारणांमुळे परीक्षेपासून वंचित राहिले आहेत, अशा सर्व वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक १८/११/२०२० ते २३/११/२०२० या कालावधीत एम.सी.क्यू.पॅटर्ननुसार फक्त Online पध्दतीने परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. याबाबत याबाबत सविस्तर माहिती यथावकाश कळविण्यात येईल.** अशा विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालय/ परिसंस्था तसेच विद्यापीठ प्रशाळा/विभागातील 'ऑनलाईन परीक्षा समन्वयक' यांचेशी संपर्क साधून ऑनलाईन परीक्षेबाबत माहिती जाणून घ्यावी व नमूद कालावधीमध्ये ऑनलाईन परीक्षेस प्रविष्ठ व्हावे. ऑनलाईन परीक्षेबाबतची माहिती व समन्वयकांची यादी विद्यापीठाच्या http://nmu.ac.in/examination.aspx या लिंकवर उपलब्ध आहे.

या परीक्षेपासून विद्यार्थी वंचित राहून नये, सदर बाब सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती

आपला विश्वासू,

(भ. प्र. पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव:-

१) परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व विद्याशाखांचे उपकुलसचिव/सहायक कुलसचिव/कक्ष अधिकारी तसेच परीक्षा गोपनीय (पूर्वार्ध व उत्तरार्ध) विभागातील सर्व संबंधित अधिकारी, कबचौउमवि, जळगाव.